आज दि. ३० एप्रिल २०२४ रोजी मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा प्राचार्य कार्यालयात स. ९ वा. आयोजित करण्यात आली. या सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे
उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे
डॉ. बाळासाहेब अनुसे
प्रा. हंसराज भांगे
प्रा. प्रतिक्षा खराडे — Pkharade

विषय क्र. १ – मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वर्षभरात मराठी विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा घेतला.

विषय क्र. २ – मराठी विभागाच्या वतीने 'वाचकवीर पुरस्कार' कु. प्रणव तिमुणे या विद्यार्थ्याला देण्यात आला. या संदर्भात माहिती देण्यात आली.

विषय क्र. ३ – अभ्यासक्रमपूर्ण अहवाल, वार्षिक नियोजन पूर्तता अहवाल, या संदर्भात चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ४ – एम. ए. भाग २ व मराठी स्पेशल विषय घेतलेल्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाची चर्चा करण्यात आली.

विषय क्र. ५ – प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मार्गदर्शन करताना मराठी विभागाने राबविलेल्या उपक्रमांबद्दल आनंद व्यक्त केला. वाचकवीर पुरस्कार, पुस्तक भेट, दिवाळी अंक भेट, विशेषांक प्रकाशन आदि उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होणार असल्याचे ते म्हणाले. पीएच.डी रिसर्च सेंटरच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यांनी प्राध्यापकांना संशोधन लेख प्रसिद्ध करण्याचे आवाहन केले.

सर्वांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR